नस्ती क्र.

# जिल्हा परिषद, कोल्हापूर
# पंचायत समिती भुदरगड

---

## शिक्षण विभाग,
## पंचायत समिती भुदरगड

# योजनांविषयाबाबतची माहिती

## शिक्षण विभाग, पंचायत समिती भुदरगड

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना

विद्यार्थ्यांना अपघातामुळे पोहोचलेल्या क्षतीची काही प्रमाणात भरपाई व सुरक्षा कवच देण्याच्या दृष्टीने राज्यातील इ. १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी विद्यार्थी अपाघात सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येते. यामध्ये शासन निर्णय दि. २१/०६/२०२२ नुसार लाभार्थी निवडीचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यु :- **१,५०,०००/-**

२. अपघातामुळे कायमचे अपंगत्व (२ अवयव / २ डोळे किंवा १अवयव व १ डोळा ) :- **१,००,०००/-**

३. विद्यार्थ्यांस अपघातामुळे शस्त्रक्रीया करावी लागल्यास :- **प्रत्यक्ष हॉस्पीटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त १,००,०००/-**

४. विद्यार्थी आजारी पडून, सर्प दंशाने किंवा पोहताना मृत्यु झाल्यास :- **१,५०,०००/-**

५. विद्यार्थी कोणत्याही कारणाने जखमी झाल्यास (क्रीडा स्पर्धेत खेळताना, शाळेतील जड वस्तु पडून, आगीमुळे, विजेचा धक्का, विज पडून) :- **प्रत्यक्ष हॉस्पीटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त १,००,०००/-**

शस्त्रक्रियेबाबतचे हॉस्पीटलचे प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांच्या प्रति स्वाक्षरीसह.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शिक्षण संचालनालय(योजना) महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

### राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना-तपासणी सूची-परिशिष्ट-अ

अ)विद्यार्थी मयत असल्यास

| अ.क्र | कागदपत्रे | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय दि.२१.०६.२०२२ नुसार विवरण पत्र-अ | अर्जदार स्वाक्षरी व मुख्याध्यापक स्वाक्षरी |
| २ | विद्यार्थ्यांचे बोनाफाईड | मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीसह |
| ३ | विद्यार्थ्यांचे आधार कार्ड | मुख्याध्यापकाच्या सही शिक्क्यासह |
| ४ | आईच्या नावाचे(राष्ट्रीय कृत बँक) बँकेचे पासबुकाच्या पहिल्या पानाची स्पष्ट झेरॉक्स/ आई हयात नसलेस वडिलांचे /दोन्ही हयात नसल्यास १८ वर्षांवरील भाऊ किंवा बहिणीचे पालक | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ५ | आईचे/वडीलांचे वारसाचे आधारकार्ड | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ६ | वारसाचे रेशनकार्ड(मयत व्यक्तीच्या नावाच्या समावेश असलेले | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ७ | एफ.आय.आर.(प्रथम खबरी अहवाल) | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ८ | स्थळ पंचनामा(Spot panchnama) | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ९ | इन्क्वेस्ट पंचनामा(मरणोत्तर पंचनामा) | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| १० | ऑनलाईन १७४ धारा रिपोर्ट | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ११ | शवविच्छेदन अहवालावर सिव्हिल सर्जन यांची प्रतिस्वाक्षरीसह (P.M.Report) | सिव्हिल सर्जन यांच्या मूळ सहिचे प्रमाणपत्र |
| १२ | मृत्यु प्रमाणपत्र सिव्हिल सर्जनच्या स्वाक्षरीसह | सिव्हिल सर्जन यांच्या मूळ सहिचे प्रमाणपत्र |

ब) विद्यार्थ्यांची शस्त्रक्रिया झालेली असल्यास

| अ.क्र. | कागदपत्रे | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय दि.२१.०६.२०२२ नुसार विवरण पत्र-अ | अर्जदार स्वाक्षरी व मुख्याध्यापक स्वाक्षरी |
| २ | विद्यार्थ्यांचे बोनाफाईड | मुख्याध्यापकांचे सही शिक्क्यासह |
| ३ | विद्यार्थ्यांचे आधार कार्ड | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ४ | विद्यार्थ्यांचे बँक पासबुक छायांकित प्रत/वडिलांचे बँक पासबुक | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ५ | वडील / आई/पालक यांचे आधार कार्ड | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ६ | रेशन कार्ड (विद्यार्थ्यांच्या नावांचा समावेश असलेले) | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ७ | फॉर्म ए.बी.सी.डी.विद्यार्थी दवाखान्यात ॲडमिट असेल तर | वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यासह मूळ प्रत |
| ८ | दवाखान्याचे प्रमाणपत्र | सिव्हिल सर्जन यांच्या मूळ सहिचे प्रमाणपत्र |
| ९ | डिस्चार्ज सर्टीफिकेट | ॲडमिट तारीख व डिस्चार्ज तारीख आवश्यक |
| १० | दवाखान्यातील सर्व आवश्यक कागदपत्रे व मूळ मेडिकल बीलाच्या पावत्या. | पालकांच्या पेड बाय मी च्या स्वाक्षरीसह |

क) विद्यार्थ्यांचा एक/दोन अवयव कायमचे निकामी झाल्यास

| अ.क्र. | कागदपत्रे | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय दि.२१.०६.२०२२ नुसार विवरण पत्र-अ | अर्जदार स्वाक्षरी व मुख्याध्यापक स्वाक्षरी |
| २ | विद्यार्थ्यांचे बोनाफाईड | मुख्याध्यापकांचे सही शिक्क्यासह |
| ३ | विद्यार्थ्यांचे आधार कार्ड | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ४ | विद्यार्थ्यांचे बँक पासबूक छायांकित प्रत/वाडिलांचे बँक पासबुक | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ५ | वडिल / आई/पालक यांचे आधार कार्ड | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ६ | रेशन कार्ड (विद्यार्थ्यांच्या नावांचा समावेश असलेले) | मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत |
| ७ | फॉर्म ए ओ.सी डी विद्यार्थी दवाखान्यात ऍडमिट असेल तर | वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सही शिक्क्यासह मुळ प्रत |
| ८ | दवाखान्याचे प्रमाणपत्र | सिव्हिल सर्जन यांच्या मुळ सहिचे प्रमाणपत्र |
| ९ | दवाखान्यातील सर्व आवश्यक कागदपत्र व मूळ मेडिकल बीलाच्या पावत्या | पालकांच्या पेड बाय मी च्या स्वाक्षरीसह |
| १० | डिसचार्ज सर्टीफिकेटवर व विवरणपत्र-अ मध्ये ऍडमिट तारीख व डिसचार्ज तारीख आवश्यक | सिव्हिल सर्जन यांची प्रतिस्वाक्षरीसह. |
| ११ | अपंगत्व आलेबाबतचे प्रमाणपत्र | जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे साक्षांकित प्रमाणपत्र |

(डॉ.महेश पालकर)
शिक्षण संचालक
शिक्षण संचालनालय(योजना)
महाराष्ट्र राज्य,पुणे-०१

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना प्रपत्र-५

### फ्लो चार्ट(कृती)

मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी आपले शाळा/ परिसरामध्ये सदर योजनेबाबतची माहिती द्यावी.तसेच आपल्या कार्यालयाच्या दर्शनीभागात या योजनेबाबतचे सविस्तर माहितीपत्रक लावावे.

शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१५२/एसडी-६ दिनांक :-२१ जून,२०२२ चे सहपत्र
विवरण पत्र-अ दाव्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुन्या मध्ये परिपूर्ण माहिती अर्जदाराने/पालकाने मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे कडे सादर करावेत.( नमूना विवरण पत्र-अ व तपासणी सूची पहावी..)

मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी तपासणी सूची प्रमाणे अर्जाची व सर्व कागदपत्राची तपासणी करावी. काही त्रुटी असल्यास त्याचवेळेस अर्जदाराच्या/पालकाच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. त्रुटी पूर्ण करुन घेऊन परिपूर्ण अर्ज स्विकारण्यात यावेत. ( नमूना विवरण पत्र-अ व तपासणी सूची पहावी..)

मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी तपासणी सूची प्रमाणे तपासणी करुन विहित नमून्यातील परिपूर्ण अर्ज गटशिक्षणाधिकारी यांचे कडे सादर करावे. (नमूना विवरण पत्र-अ व तपासणी सूची पहावी.)

गटशिक्षणाधिकारी यांनी अर्जाची तपासणी सूची प्रमाणे तपासणी करावी. काही त्रुटी असल्यास त्यावेळेस मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे निदर्शनास आणून देण्यात याव. त्रुटी पूर्तता पूर्ण करुन परिपूर्ण अर्ज स्विकारण्यात यावा. ( नमूना विवरण पत्र-अ तपासणी सूची पहावी.)

गटशिक्षणाधिकारी यांनी तपासणी सूची प्रमाणे तपासणी करुन विहित नमून्यातील परिपूर्ण अर्जाचे एकत्रिकरण करुन शिक्षणाधिकारी(योजना) जि.प.------- यांचेकडे सादर करावेत. ( नमूना विवरण पत्र-अ तपासणी सूची पहावी.)

शिक्षणाधिकारी(योजना) जि.प.---- यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त सर्व अर्जाचे एकत्रितकरुन तपासणी सूची प्रमाणे तपासणी करावी. काही त्रुटी असल्यास त्यावेळेस गटशिक्षणाधिकारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावी. (सोबत नमूना विवरण पत्र-अ तपासणी सूची)

शिक्षणाधिकारी(योजना)जि.प.-----यांनी गटशिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त परिपूर्ण अर्जाच्या माहितीचे जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करावयाच्या विहित नमून्यात एकत्रिकरण करावे. जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीसाठी वेळ व दिनांक घेऊन सदरचे सर्व प्रस्ताव मंजूरीकरीता जिल्हास्तरीय समिती समोर ठेवावेत.(सोबत जिल्हास्तरीय समिती समोर ठेवायचा विहित नमूना जोडला आहे.

शिक्षणाधिकारी(योजना) जि.प.--- यांनी जिल्हा स्तरीय समितीने मंजूर केलेल्या विहित नमून्यातील प्रस्तावाची परिपूर्ण माहिती सर्व सदस्यांच्या स्वाक्षरी व बैठकीच्या इतिवृत्तासह सानुग्रह अनुदान मागणीचा प्रस्ताव शिक्षण संचालक,शिक्षण संचालनालय(योजना) ,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालयास सादर करावेत.

शिक्षण संचालनालय(योजना),म.रा.पुणे यांच्याकडून निधी उपलब्ध होताचा लाभार्थ्यांना विहित मार्गाने निधीचे वितरण करावे.

## शिक्षण विभाग, पंचायत समिती भुदरगड

### -: उपस्थिती भत्ता :-

इ. १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी क्षेत्र व आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता व इ. १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी क्षेत्रातील तसेच आदिवासी क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती व विमुक्त जातीतील दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता हा प्रोत्साहनात्मक बाब म्हणून वाटप केला जातो.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याबाबतच्या धोरणानुसार प्राथमिक शाळेमध्ये जाणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी, इ. १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील सर्व संवर्गातील मुलींना तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती व विमुक्त जातीतील दारिद्र्य रेषेखालील मुलींना नियमित शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रत्येक मुलीमागे १/- रु. याप्रमाणे मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता देण्यात येतो.

शिक्षण विभाग, पंचायत समिती भुदरगड

**समग्र** शिक्षा अभियान योजना

**विषय :- मोफत पाठयपुस्तक योजना.**

मोफत पाठयपुस्तक योजना ही राज्य सरकारची योजना असून या योजने अंतर्गत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील व अनुदानित खाजगी शाळेतील इ. १ ली ते ८ वी च्या वर्गातील सर्व मुलामुलीना समग्र शिक्षा अभियान योजनेअंतर्गत सर्व मुलामुलीना मोफत पाठय पुस्तकांचे वाटप करणे बाबत शासन निर्णयामध्ये तरतूद असून पंचायत समिती शिक्षण विभाग भुदरगड कडून प्रत्येक वर्षी सदर विदयार्थ्यांना मोफत पाठय पुस्तकांचे वाटप केले जाते.


# प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

प्रधानमंत्री पोषण शक्तीनिर्माण योजनेअंतर्गत १ ली ते ८ च्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते.ही योजना १९९५ पासून शासन नियमानुसार चालू आहे. भुदरगड गटाकडे सन २०२५/२६ मध्ये एकूण २११ शाळा या योजनेअंतर्गत पात्र असून १ ली ते ५ वी चा पट ७०३८ व ६ ते ८ वी चा पट ५७५३ असा एकूण १२७९१ इतका पट आहे.

या योजनेअंतर्गत पोषण आहारात मसूरडाळ , मटकी, चवळी, वाटाणा, हरभरा, तूरडाळ, अख्खा मूग इत्यादी कडधान्यांचा समावेश असतो. तसेच प्रत्येक शाळेत परसबाग निर्माण करण्यास प्रोत्साहान दिले जाते. व परसबागेतून मिळणाऱ्या भाजीपाल्याचा वापर विद्यार्थ्यांच्या आहारात केला जातो. शालेय पोषण आहार शिजवण्यासाठी किचन शेड ची उपलब्धता करुन देण्यात आलेली आहे.

भुदरगड गटाकडे या योजनेअंतर्गत पोषण आहार शिजवण्यासाठी ३४८ स्वयंपाकी व मतदनीस कार्यरत असून त्यांना दरमहा २५०० रु इतके मानधन दिले जाते. व १ली ते ५वी च्या लाभार्थ्यामागे २.५९रु व ६वी ते ८वी च्या लाभार्थ्यामागे ३.८८ रु इतके अनुदान शासन स्तरावरुन शाळेच्या खात्यावर जमा केले जाते.


मध्यान्ह भोजन


किचन शेड


परसबाग

शिक्षण विभाग पंचायत समिती भुदरगड

विभागाचे नाव- समग्र शिक्षा

| अ.क्र | योजनेचे नाव | योजनेचे निकष | निवड प्रक्रिया | योजनेचे फॉर्म कोठे मिळतात | सदरची योजना कोणत्या स्तरावर उपलब्ध आहे. तालुका/जिल्हा/राज्य/केंद्र | सदर योजना मंजुरीचे अधिकार कोणास आहेत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोफत पाठयपूस्तक योजना | इयत्ता १ ली ते ८ वी जिल्हा परिषद व खाजगी अनुदानीत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना | शाळास्तरावर | | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| २ | मोफत गणवेश योजना | जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना | शाळास्तरावर | | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ३ | मोफत बुट व पायमोजे योजना | जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना | शाळास्तरावर | | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ४ | विद्यार्थी वाहतूक सुविधा | जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १ ली ५ वी साठी १ किमी व इयत्ता ६ वी ८ वी ३ किमी पेक्षा जास्त वाडयावस्ता/शाळेपासूनचे अंतर असणारे विद्यार्थी | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ५ | शिक्षक प्रशिक्षण | इयत्ता १ ली १२ वीच्या सर्व शिक्षक / मुख्याद्यापक | पं.स.भुदरगड | | तालुका | गटशिक्षणाधिकारी | |
| ६ | बांधकाम | शाळा वर्ग खाली बांधकाम , वर्ग खोली दुरुस्ती , भौतीक सुविधा | शाळेची पटसंख्येनूसार/ निंलेखन/दुरुती | U-Disc नूसार | राज्य/केंद्र | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई | |
| ५ | समावेशित शिक्षण उपक्रम | | | | | | |
| १ | आरोग्य तपासणी | इयत्ता १ ली १२ वी दिव्यांग विद्यार्थी | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| २ | मदतीनस भत्ता | इयत्ता १ ली १२ वी दिव्यांग विद्यार्थी ४०% सटीफिकेट धारक | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ३ | प्रवास भत्ता | इयत्ता १ ली १२ वी दिव्यांग विद्यार्थी ४०% सटीफिकेट धारक | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ४ | वाचक भत्ता | इयत्ता १ ली १२ वी दिव्यांग विद्यार्थी ४०% सटीफिकेट धारक | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ५ | प्रोत्हाहन भत्ता | इयत्ता १ ली १२ वी दिव्यांग मुर्लीसाठी | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ६ | थेरपी सेवा अनुदान | इयत्ता १ ली १२ वी दिव्यांग CP/MR/MD/SI/HI विद्यार्थी | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |
| ७ | साहित्य साधने व उपकरणे | शिबीरामधून संदर्भात दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधन व उपकरणे दिली जातात | शाळास्तरावर | शाळास्तरावर | शाळास्तरावर | गटशिक्षणाधिकारी | |

शिक्षण